वाचले :

१. आदेश क्र.प्रशा/२/कावि/१२/२०२३ दिनांक १०/०१/२०२३

२. मा.आयुक्त सो यांचेकडील दिनांक ०७/०६/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८,
सामान्य प्रशासन विभाग,
क्र:सा.प्र.वि/०२/कावि/३०४/२०२४
दिनांक : ०७/०६/२०२४

विषय- अतिरिक्त आयुक्त पिंपरी चिंचवड म.न.पा.यांचेकडील विभागनिहाय कामकाज वाटपा बाबत.

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील अतिरिक्त आयुक्त पदावरील अधिका-यांना दिनांक १०/०१/२०२३ रोजीच्या आदेशान्वये विभागनिहाय कामकाज वाटप करण्यात आलेले आहे. त्यानुसार स्थापत्य विषयक कामकाज अतिरिक्त आयुक्त-१ यांच्याकडे तर पशुवैद्यकीय विभागाचे कामकाज अतिरिक्त आयुक्त-२ यांच्याकडे सोपविण्यात आलेले आहे. तथापि पशुवैद्यकीय विभागांतर्गत बहिणाबाई चौधरी प्राणिसंग्रहालयतील स्थापत्य विषयक कामकाजातील निर्णय प्रक्रीयेमध्ये योग्य समतोल साधण्यासाठी तसेच निर्णयप्रक्रिया सुलभ व जलद होणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३९ (अ) (१) नुसार अतिरिक्त आयुक्त, आयुक्तांच्या नियंत्रणाच्या, अधिनतेने, आयुक्तांच्या सर्व किंवा कोणत्याही अधिकारांचा वापर करील आणि त्याची सर्व किंवा कोणतीही कर्तव्ये व कार्ये पार पाडील, या तरतुदीनुसार **पशुवैद्यकीय विभागांतर्गत बहिणाबाई चौधरी प्राणिसंग्रहालयाकडील केवळ स्थापत्य विषयक कामकाज अतिरिक्त आयुक्त-२ यांचेकडे सोपविण्यात येत आहे.**

संबंधित अतिरिक्त आयुक्तांनी या विभागांसाठी आयुक्तांच्या सर्व अधिकारांचा वापर करून विभागाची कर्तव्ये व कार्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व शासन आदेशानुसार पार पाडावयाची आहेत. तथापी त्यांचे अखत्यारीतील विभागा अंतर्गतचे धोरणात्मक निर्णय घेण्यासबंधीचे मा. महापालिका/मा.स्थायी समिती यांना सादर करावयाचे सर्व प्रस्ताव आयुक्तांची मान्यता घेऊनच सादर करण्यात येतील याची दक्षता घ्यावी. प्रस्तुत अधिकारामध्ये बदल करणे अथवा निरस्त करणे या बाबतचे हक्क मी स्वतः कडे राखून ठेवत आहे.

प्रस्तुतच्या आदेशाची अंमलबजावणी आदेशाचे दिनांकापासून करावी.

सही/-
(शेखर सिंह)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

उप आयुक्त(सा.प्र.वि)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रति, १.मा.अतिरिक्त आयुक्त, १, २, ३
२.सर्व संबंधित अधिकारी

प्रत, सर्व सबंधित विभाग

E:\desktop\mandhan gr\dhoran.docx